सत्यमेव जयते

# लोक आयुक्त कार्यालय
## महाराष्ट्र राज्य

नवीन प्रशासन भवन,
१ला व ३रा मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
फॅक्स : ०२२-२२०२ ४५४०, दूरध्वनी क्र. : ०२२-२२८५ २९०१ /२२८३ ५६००/२२८२ ४३५८
ई-मेल आयडी : *soadm.lokayukta@maharashtra.gov.in*

संदर्भ :                                                                 दिनांक : 16 SEP 2026

क्र.आस्थापना/९००७/ का.आ./२०२६/६४१ 18451/26

**कार्यालयीन आदेश**

महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे सादर करण्यात येणाऱ्या सर्व तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने सर्व तक्रारदार यांना सूचित करण्यात येते की, तक्रार अर्ज सादर करताना सोबत जोडलेल्या यादीनुसार योग्य प्रकारे पडताळणी करावी. तक्रार अर्जामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी, विसंगती किंवा अपूर्णता आढळून आल्यास सदर तक्रार अर्जाची या कार्यालयामार्फत नोंदणी करण्यात येणार नाही. तसेच तक्रार अर्ज सादर करण्यापूर्वी त्यामधील सर्व तपशील व संलग्न कागदपत्रे पूर्ण व अचूक असल्याची खात्री करुनच तक्रार अर्ज सादर करावा.

16/9/26

(अशोक प्रा. जाधव)
**प्रबंधक**

## लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयात तक्रार अर्ज दाखल करताना खालील बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१) तक्रार अर्ज मूळ स्वरुपात हवा.

२) तक्रार अर्जाच्या २ जादा प्रती जोडणे आवश्यक आहे.

३) तक्रार अर्ज स्वसाक्षांकित केलेला असावा.

४) पत्रव्यवहाराचा पत्ता नमुद करणे आवश्यक आहे. तसेच संपर्कासाठी उपलब्ध असल्यास दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडीचा उल्लेख करावा.

५) ओळखीचा पुरावा (आधार कार्ड/पॅन कार्ड/वाहनचालक परवाना/पारपत्र इत्यादी) सादर करणे आवश्यक आहे.

६) ज्या लोकसेवकाविरुध्द तक्रार केली आहे त्या लोकसेवकाचे नाव, पदनाम आणि कार्यालयाचा पत्ता नमूद करणे आवश्यक आहे.

७) तक्रारीच्या पुष्ट्यर्थ आवश्यक कागदोपत्री पुरावा तसेच पत्रव्यवहारांच्या प्रती सादर करणे आवश्यक आहे.

८) पिडीत व्यक्तीच्या नातेवाईक असल्याचा अथवा त्यांचे कायदेशीर प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार असल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

९) लोकसेवकाविरुध्द केलेल्या आरोपांच्या/भ्रष्टाचाराच्या समर्थनार्थ सक्षम अधिकाऱ्यासमोर साक्षांकीत केलेले प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०) आरोपांच्या/भ्रष्टाचाराच्या समर्थनार्थ तपासण्यासाठी साक्षीदारांची नावे व पत्ते नमूद करणे आवश्यक आहे.

११) गाऱ्हाणेयुक्त तक्रार दाखल करण्यास १ वर्षापेक्षा अधिक विलंब का झाला त्याबाबतचा खुलासा करणे आवश्यक आहे.

१२) आरोपाची/भ्रष्टाचाराची घटना घडल्याचा दिनांक नमूद करावा.

१३) तक्रारीत नमुद विषयाबाबत कोणत्याही न्यायालयासमोर, राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या समितीसमोर किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणासमोर तक्रार दाखल केली आहे किंवा कसे ? त्याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.